स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/६४ दि. १०/०६/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून १० कोटी वृक्ष लागवड अभियानात सक्रिय सहभाग नोंदविणेबाबत...
संदर्भ : रासेयो/२०२५–२६/५५, दि. ०४/०६/२०२५ चे पत्र

महोदय,

मा.मुख्यमंत्री महोदयांनी जागतिक पर्यावरणदिनाच्या निमित्ताने राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत केलेल्या आवाहनास अनुसरून आणि मा. राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार राज्यातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी या आवाहनास सक्रिय प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा अशी इच्छा मा.ना.श्री. चंद्रकांत(दादा) पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी प्रदर्शित केली आहे.

तसेच वरिल संदर्भीय पत्रानुसार 'एक पेड मा के नाम' हे अभियान आपण राबवत आहोतच. योगायोगाने मा.ना.श्री. चंद्रकांत(दादा) पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा वाढदिवस देखील याच सप्ताहात मंगळवार, दिनांक १० जून २०२५ रोजी येत आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वयंसेवक यांच्या सहभागातून वृक्ष लागवड उपक्रम राबवून, राबवलेल्या उपक्रमाचा अहवाल त्वरीत https://forms.gle/cJ3JmTMCpt4RGB4n6 या गुगल लिंकमध्ये भरण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५


क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र. ५४/रासेयो कक्ष दिनांक: ०९ जुन, २०२५

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**

राष्ट्रीय सेवा योजना,

सर्व अकृषी विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/संस्था/संचालनालये, महाराष्ट्र राज्य.

विषय : मा. मुख्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून १० कोटी वृक्ष लागवड अभियानात सक्रिय सहभाग नोंदविणेबाबत....

मा.मुख्यमंत्री महोदयांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत केलेल्या आवाहनास अनुसरून राज्यातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी या आवाहनास सक्रिय प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा अशी इच्छा मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी प्रदर्शित केली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी केलेले आवाहन, त्यास अनुसरुन मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेले निदेश विचारात घेऊन आपल्याला ही मोहीम त्वरित हाती घेणे आवश्यक आहे. आपणा सर्वांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे की मा. क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांच्याकडून सूचित करण्यात आल्यानुसार "एक पेड मा के नाम" हे अभियान आपण राबवत आहोतच. योगायोगाने मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचा वाढदिवस देखील याच सप्ताहात मंगळवार, दिनांक १० जून २०२५ रोजी येत असल्याने एकूणच या वृक्ष लागवडीच्या मोहिमेस प्राप्त झालेले अनन्यसाधारण असे महत्व ओळखून सर्वाधिक वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट समोर ठेऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवायची आहे.

रासेयो कार्यक्रम समन्वय तथा संचालक यांनी आपल्या विद्यापीठातील परिसरात व विद्यापीठातर्गंत महाविद्यालय परिसरात तसेच शहरात व गावात अन्य ठिकाणी महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनखाली रासेयो स्वयंसेवाकांमार्फात वृक्ष लागवड अभियान राबविण्याबाबत आपल्यास्तरावर योग्य नियोजन करण्यात यावे. मंगळवार, दिनांक १० जून २०२५ रोजी सदर अभियानाची सुरुवात स्थानिक वृतपत्र प्रतिनिधी, न्युज चॅनलचे प्रतिनिधी यांना निमंत्रित करून त्यांच्या उपस्थितीत करण्यात यावी. आपल्यामार्फत करण्यात आलेले

नियोजन, वृक्ष लागवडीचे प्रासंगिक छायाचित्रे इ. बाबतचा सविस्तर अहवाल राज्य सपंर्क अधिकारी, रासेयो,महाराष्ट्र राज्य व  रासेयो क्षेत्रिय संचालक, पुणे यांना ई-मेल व हार्ड कॉपी मध्ये पाठविण्यात यावा.

(डॉ. निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन